अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दि.२०-२-२००७.

..............................................................

**प्रस्तावाचा विषय** - मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ अन्वये तयार करण्यात आलेले अहमदनगर महानगरपालिकेचे सन २००६-२००७ सालचे सुधारीत व सन २००७-२००८ सालचे बाबवार जमा खर्चाचे अंदाजपत्रक (स्कुल बोर्डासह ) मा.स्थायी समितीचे शिफारशीसह मंजुरीसाठी.

**--*--**

**प्रस्तावाचा मजकूर** - अहमदनगर महानगरपालिकेच्या सन २००६-२००७ चे सुधारीत व सन २०००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रकास (महानगरपालिका स्कुल बोर्डासह )मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १ दिनांक २/२/२००७ अन्वये मंजुरी मिळाली असून सदरचे अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेचे मान्यतेसाठी पाठविणेबाबत शिफारस करण्यात आलेली आहे.तरी आदेशार्थ सादर.

यावर मा.उपायुक्त (सामान्य ) यांचा अभिप्राय की, ठरावामध्ये दर करात सुधारणा आहेत त्यामुळे २० फेब्रुवारी पुर्वी अंदाजपत्रक मा.सर्व साधारण सभेपुढे ठेवणे आवश्यक आहे.त्यामुळे ठराव पुढील उचीत कार्यवाहीसाठी नगरसचिवांकडे पाठविणे उचीत राहील आदेशार्थ सादर.

अशा बाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (सामान्य ) मा.आयुक्त सो, मा.महापौर सो, यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.महासभेपुढे ठेविला.

मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १ दिनांक २-२-२००७

ठराव- सन २००७-२००८ सालचे बाबवार जमा खर्चाचे मुळ अंदाजपत्रकावर व सन २००७-२००८ या आगामी वर्षा पासून कराचे दरा मध्ये फी मध्ये वाढ /घट करणे, आकारणी करणे, सुट देणे बाबत संबंधीत विभागाने सादर केलेल्या सविस्तर प्रस्तावावर सभे मध्ये सखोल साधक बाधक चर्चा करणेत येउन ही सभा पुढील प्रमाणे शिफारस दुरूस्त्या करीत आहे.

प्रस्ताव क्रमांक.एक -आरोग्य विभाग - कार्यालयाने सादर केलेल्या प्रस्तावा प्रमाणे सोनोग्राफी शुल्क रूपये पन्नास फक्त दर आकारणी करण्यास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

प्रस्ताव क्रमांक. दोन -आरोग्य विभाग -नागरी घन कचरा (व्यावस्थापन व हाताळणी) नियम २००० व मा.सर्वोच्च न्यायालयाचे निर्देशानुसार ओला व सुका कचरा वेगवेगळे डबे ठेउन साठवणूक करणे आवश्यक असल्याने सदर सुचनांचे उल्लंघन केल्यास दंड आकारणी करण्यास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे. पंरतु कार्यालयाने सुचविलेल्या रूपये पन्नास ऐवजी रूपये वीस प्रमाणे दंडआकारणी करणेस शिफारस करण्यांत येत आहे.

प्रस्ताव क्रमांक. तीन- माहिती तंत्रज्ञान धोरण कार्यालयाने सादर केल्याप्रमाणे जकात नियम २००५ चे नियम नंबर चार **'ब'** नंतर **क**] शासनाच्या धोरणानुसार जो उध्योग माहिती तंत्रज्ञान उध्योग असेल. अशा उद्योगांना मा.आयुक्त साहेबांच्या मंजूरीने उध्योगासाठी आयात कराव्या लागणा-या सर्व साहित्यावर जकात माफी राहिल. **ड**] माहिती तंत्रज्ञान शिक्षणाचे कार्य करणा-या सर्व शासन अनुदानीत संस्था मध्ये केवळ शैक्षणिक कार्यासाठी आयात केल्या जाणा-या सर्व मालास जकात माफी राहिल. याप्रमाणे जकात नियम २००५ मध्ये सुधारणा करण्यांस तसेच अहमदनगर महानगरपालिका क्षेत्रातील हद्दीत आय.टी आणि आय.टी.इ.एस्. पॉलीसी २००३ व २००५ नुसार इंडस्ट्रीज चालू झाल्यास सदर प्रॉपर्टीज बिल्डींग प्रिमायसेस ला रेशिडेन्शिअल प्रिमायसेस ग्राहित धरून कर आकारणी करणे बाबत प्रस्तावास मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

प्रस्ताव क्रमांक.चार - पाणी पुरवठा विभाग कार्यालयाने सुचविल्या प्रमाणे अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील नळ कनेक्शन धारकांना मिटर द्वारे पाणी पुरवठा करणेस व त्या बध्दल त्यांना.

१] घरगुती वापर = रूपये पांच प्रती एक हजार लिटर.

२] व्यापारी वापर- रूपये पंधरा प्रती एक हजार लिटर.

३] औध्योगिक वापर -रूपये वीस प्रती एक हजार लिटर.

या प्रमाणे पाणी पट्टी आकारणी करणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

तसेच अ) अपार्टमेंट ( प्लॅटसिस्टीम) मधील प्लॅट धारकांसाठी मिटर ग्रुप कनेक्शन सिस्टीम चालू करण्यांत यावी. आणि अशा इमारती मधील सर्व प्लॅट धारकांनी मिटर सिस्टीम लागू करून घेतल्यास त्यांना जनरल पाणी पट्टी आकारणी करणेत येउ नये. ब) रहिवासी इमारतीचे अर्धा इंची

नळ कनेक्शन धारकांनी मिटर पध्दतीचा अवलंब केले नंतर नळाला पाणी आले नाही.तर त्यांचे कडून दरमहा रूपये पन्नास प्रमाणे सरासरी पाणी पट्टीची आकारणी करण्यांत यावी. क) कमर्शिअल अर्धा इंची नळ कनेक्शन धारकंानी मिटर पध्दतीचा अवलंब केल.नंतर नळाला पाणी आले नाही तर त्यांचे कडून दरमहा रूपये तीनशे पन्नास फक्त प्रमाणे सरासरी पाणी पट्टीची आकारणी करण्यांत यावी. ड) कमर्शिअल इमारतीना मिटर पध्दतीने पाणी पुरवठा करणे (कंपलसरी) बंधनकारक करावे. याप्रमाणे शिफारसी करण्यांत येत आहेत.

प्रस्ताव क्रमांक.पांच- वसुली विभाग - महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता धारकंानी १] सोलर सिस्टीम. २] बायोगॅस संयत्र व , ३] रेन वॉटर हार्वेस्टींग या पैकी दोन योजना राबविल्यास त्यांना मालमत्ता करात त्याच वर्षा करितां फक्त दहा टक्के सुट देणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे. त्याच प्रमाणे नवीन बांधण्यांत येणा-या इमारतीचे मालकंाना सदरच्या तीन ही योजना राबविणे कंपलसरी करण्यांत यावे.

प्रस्ताव क्रमांक. सहा- विद्युत विभाग -अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील सध्या वापरात असलेल्या स्ट्रीट लाईट फिटींगद्वारे येणारे विद्युत बील नवीन उर्जा कार्यक्रम (Energy Efficient) उपकरणे / नवीन तंत्रज्ञान यांचा वापर करून कमी करणे बाबत कार्यालयाने सुचविल्या नुसार कार्यवाही करणेस व सदर प्रकल्प Boot तत्वावर खाजगी कंपन्याद्वारे राबविणेस मंजूरी देणेस शिफारस करण्यांत येत आहे.

महानगरपालिकेने बेग पटांगणामध्ये प्रशासकीय इमारत कम शॉपिंग कॉम्लेक्स प्रकल्प खाजगी तत्वावर न करता विकास भार निधीतुन महानगरपालिके मार्फत स्वताःच करणेत यावा. व सदरचे काम त्वरीत मार्गी लावणे साठी आवश्यक ती कार्यवाही करावी. त्याच प्रमाणे मा.आयुक्त साहेब यांनी मनोगता मध्ये सुचविलेल्या योजना राबविणे कामी उपाय योजना करणेस शिफारस करण्यांत येत आहे. तसेच मा.स्थायी समिती सदस्यांनी सुचविलेली कामे अंदाज पत्रकातील संबंधीत लेखीशिर्षा मधून करणेत यावी.

सन २००७-२००८ सालचे अंदाजपत्रका मध्ये सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चे प्रमाणे सोबत जोडलेल्या तक्त्या मध्ये दर्शविल्या नुसार अंदाजित रकमा कमी जास्त करणेस नवीन लेखा शिर्ष तयार करून त्यावर तरतुद करणेस मंजूरी देणे विषयी शिफारस करण्यांत येत आहे.

अंदाज पत्रकाच्या प्रती छापून घेउन महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरील प्रमाणे सुचविलेल्या दूरूस्त्या शिफारसी सह सन २००६-२००७ सालचे सुधारित व सन २००७-२००८ सालचे बाबवार अंदाजपत्रक महानगरपालिका स्कुल बोर्डाच्या शेअर्स सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

**चर्चा :**

श्री.गिरवले : पाईपलाईन रस्त्यांला उमाकांत चांदेकर यांचे नांव देण्यात आले होते.त्यानंतर या भागातील नागरीक व नगरसेवक यांनी यास मोठा विरोध करुन फलक काढून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर नाव दिलेले होते.हा विषय एकदाचा संपवावा.असे निवेदन करीत आहे.

श्री.आगरकर : हा विषय चर्चेचा नाही.

श्री.गंधे : हा विषय चर्चेचा होवू शकत नाही.भाजपा शिवसेना युती आल्यास आम्ही परत नांव देवू

श्री.आगरकर : हया विषयावर मागील बोर्डात चर्चा झालेली आहे.या बोर्डात हा विषय चर्चेचा नाही.आज आम्ही या बाबत चर्चा करु शकत नाही.

(बरेच सदस्य सभागृहात उठल्यानंतर गोंधळ )

श्री.आगरकर : ज्या संबंधीत अधिकारी यांनी टिपणी ठेवलेली आहे.त्यावर पुढे कार्यवाही करण्यात येणार आहे.

श्री.कानडे : हा विषय जर संपणार असेल तर मा.श्री.गिरवले यांचे म्हणणे ऐकण्यास हरकत नाही.

(सभागृहात गोंधळ )

मा.सभापती ,मा.श्री.सुभाष सोपानराव लोंढ यांनी अंदाजपत्रकावर स्थायी समितीच्या शिफारशीसह आपले मनोगत वाचून दाखवले व सर्वाचे आभार मानून अंदाजपत्रक स्थायी समितीचे शिफारशीसह सादर केले.

सुरवातीस श्री.दिप चव्हाण यांनी सदरील सभा कोणत्या स्थायी समितीच्या सदस्यांनी मागणी केल्यावरुन सभा बोलाविली आहे.त्याची नावे सांगावी व सभा अधिकृत होवू शकेल काय ?यासाठी ७ दिवसाची नोटीस दयावयास पाहीजे.त्याऐवजी ३ दिवसाची नोटीस दिलेली आहे.कार्यालयास ब-याच सुटया आलेल्या असल्यामुळे अभ्यास करता आलेला नाही.महानगरपालिकेकडे नगरसचिव आहे किंवा कसे ?

श्री.आगरकर : कोणत्याही एका अधिका-याकडे पुर्ण चार्ज दिलेला नाही.त्यामुळे पुर्ण चार्ज देण्यात यावा.

यावर मा.आयुक्त साहेब यांनी खुलासा केला.

श्री.दिप चव्हाण : ५० कोटी या बजेटमध्ये वाढविले त्याची कारणे काय आहेत.

५० कोटी बजेटमुळे प्रत्येक नागरीकांवर बोजा पडणार आहे.१५२ कोटी मध्ये ५० कोटी चे प्रस्ताव कोणत्या स्टेजवर आहेत.यावर मा.आयुक्त साहेब यांनी खुलासा केला की,शासनाकडून याबाबत जवळ जवळ ९०% अनुदान मिळणार आहे.

श्री.दिप चव्हाण : मागील वर्षी ७६ कोटीचे बजेट होते.चालू वर्षी १५२ कोटीचे बजेट झालेले आहे.परंतू बजेट हे ९८.५० टक्क्यांनी वाढले आहेत.याची कारणे काय आहेत.३३ कोटी संकलीत कर थकबाकी असतांना फक्त १३ कोटी थकबाकी कशी दाखवली आहे.

यावर मा.उपायुक्त यांनी खुलासा केला की,कोर्ट केसेस इत्यादी असल्यामुळे ३३ कोटी थकबाकी दिसते.परंतू प्रत्यक्षातील कोर्ट निकालामुळे थकबाकी कमी करणे आवश्यक आहे.त्यासाठी प्राप्त होणारी रक्कम डिमांड मध्ये धरलेली आहे.असे सांगीतले त्यावर श्री.चव्हाण यांनी विचारले की, झोन पध्दतीने आकारणी केलेली आहे.त्यास मान्यता आहे काय

श्री.दिप चव्हाण : जकात ठेकेदाराकडे जकातीची पावती पुस्तके दिलेली आहेत परंतू संबंधीत ठेकेदाराकडून संगणकावर नोंदी घेतल्या जात आहेत.त्यामुळे संगणकाच्या नोंदी प्रमाणे किती जकात वसुल झाली व जकात पुस्तकाप्रमाणे किती जकात वसुल झाली ? पुस्तके बंद झाली काय व केव्हापासून बंद झाली याचा खुलासा करावा.

श्री.नामदेव पवार : आपण पुस्तके छापून देत होतो ते आपण बंद केले काय ? करारात काय तरतूद आहे.कराराचा भंग होत असेल तर काय कार्यवाही केली जाते

श्री.आगरकर : संबंधीत अधिकारी यांनी उत्तर दयावे.

श्री.कानडे : जकातीकरीता एल.ॲण्ड ब्लॉक जकातीकरीता वगळून टेंडर काढले गेले आहे काय ?

यावर जकात अधिक्षक श्री.डवरे यांनी खुलासा केला की, टेंडर देकार रक्कम काढणेबाबत शासन निर्णयामधील निर्देशानुसार देकार रक्कम निश्चित केलेली आहे.त्याबाबतची सविस्तर आकडेवारी वाचून दाखविली आहे.तसेच एल.ॲण्ड एम ब्लॉक महानगरपालिका हद्यीतून वगळण्याबाबत टेंडरमध्ये योग्य त्या अटी नमुद करण्यात आलेल्या आहेत.

श्री.दिप चव्हाण : ३ महिन्यापासून पुस्तके देण्याचे बंद केलेले आहे याबाबत काय खुलासा आहे.याबाबत बजेट किती उत्पन्न मिळालेले आहेत.बजेट मध्ये माहिती घेता आली असती पण ती घेतली गेली नाही ही गंभीर बाब आहे.

यावर श्री.जोशी यांनी सांगीतले की, स्थायी समितीमध्ये हा प्रश्न उपस्थित केलेला होता.परंतू त्याचा खुलासा झालेला नाही.याबाबत दिप चव्हाण यांनी विचारलेल्या प्रमाणे तेव्हा किती उत्पन्न होते.व त्यानंतर किती उत्पन्न झाले याबाबत खुलासा करावा.

यावर दिप चव्हाण यांनी पुस्तके बंद का झाली केव्हापासून बंद झाली.संगणकवर वसुली केल्याबाबतचा आक्डा देण्यात यावा.यावर नामदेव पवार यांनी सांगीतले की,ठेकेदार यांनी मनमानी कारभार केलेला आहे.

श्री.आगरकर : याबाबत अधिकारी यांनी जबाबदारी पार पाडावयाची आहे.अधिकारी यांनी खुलासा करावा.

श्री.दिप चव्हाण : पुस्तकावर अकौंट कोड नंबर असतो तो संगणकावर आहे काय ?

श्री.नामदेव पवार : यामुळे कराराचा भंग होतो काय यावर काय कारवाई केली यास प्रशासन पाठीशी घालत आहे काय ?

श्री.जोशी : स्थायी समितीच्या सुचना विचारात न घेता नोटीस कशी काय काढली गेली.

श्री.कानडे : एल.एण्ड एम ब्लॉक बाबत निविदेत नमुद केले आहे काय

श्री.पाउलबुध्दे : मुद्रांक शुल्काबाबत काय आहे याबाबत खुलासा केला.

श्री.जोशी :अहमदनगर महानगरपालिकेची वेबसाईट ओपन होत नाही याबाबत काय आहे पुरवणी जाहिरात देण्यात यावी.

श्री.भानुदास कोतकर : जकातीबाबत पुन्हा एल.एण्ड एम ब्लॉक वगळून जकात वसुलीबाबत फेर निविदा पेपरमध्ये जाहिर करावी.व पुन्हा स्थायी समितीकडे पाठवावे.व सर्व अटी शर्ती येतील अशी निविदा काढावी.एल.एण्ड एम ब्लॉकचा पेपरमध्ये उल्लेख केलेला नाही.शासनाचा ज्यवेळेस आदेश येईल तो पर्यत जकात घेता येणार नाही असा उल्लेख करावा.याबाबत कोर्ट मेटर होणार नाही हे पहावे.

त्यावर श्री.अनंत जोशी यांनी सदर सुचनेस अनुमोदन दिले.

श्री.कावरे : ३ महिन्यापुर्वी ४३ कोटी निधी मिळालेला होता.आमदार खासदार व प्रशासन निक्रीय आहे.

मा.आयुक्त : एम एस आर डी सी चे अनुदान असू शकते.परंतू पोहचू शकले नाही.

श्री.दिप चव्हाण : जकात पुस्तके देण्याची पध्दत बंद का झाली.

यावर मा.महापौर साहेब यांनी चौकशी झाली पाहीजे कर्मचारी यांचेवर कारवाई करावी.कराचा भंग झालेला आहे.

श्री.दिप चव्हाण : आर्थीक नुकसान झाल्यास काय करणार

श्री.गिरवले : ३९ कोटीचा ठेका दिला पुस्तके का वापरली नाही याचा खुलासा करावा

श्री.जोशी : डिपॉझीट आपलेकडेच ठेवा अशी सुचना आहे.

श्री.दिप चव्हाण : घरपटटी वर नोटीस फी चालू वर्षाच्या बीलावर का आकारण्यात आली.

श्री.पवळे यांनी खुलासा केला की, कलम ४१ मध्ये १५ दिवसाचे आत बिल न भरल्यास नोटीस दिली पाहीजे अशी तरतूद आहे.

श्री.जोशी : नोटीस फी लावणार नाही याबाबत खुलास करणेत यावा

श्री.दिप चव्हाण : गुंठेवारी संदर्भाची कार्यवाही लवकरात लवकर करावी.

श्री.दिप चव्हाण : पाणी पटटीची १५ कोटीची डिमांड असतांना ७ कोटी धरणेत आलेली आहे.ती १५ कोटी धरणेत यावी.मीटर बसविणेबाबत कुणी कळविलेले आहे.

यावर मा.आयुक्त यांनी खुलास केला की, कमर्शीअल वापरासाठी मिटर पध्दतीने पाणी पुरवठा करणेबाबत ठराव झालेला आहे.

श्री.दिप चव्हाण : दलीत वस्ती चे ५० लाख पडून असतांना कामे झालेली नाही.यावर मा.महापौर यांनी खुलाला केला की, झेड पी ची जागा असल्याने अडचणी येत आहे.

यावर आयुक्त यांनी खुलासा केला की,सदरचा विषय पुढील मिटींग पुढे पाठविणार आहोत.

श्री.दिप चव्हाण : पवन उर्जा संदर्भाबाबत तरतूद होत आहे.परंतू कार्यवाही होत नाही याबाबत खुलासा करावा.टँकरने पाणी वाटपावर एक कोटी खर्च होतात.व १५० कोट मध्ये २ कोटी रुपये खर्च होतात.याबाबत दखल घ्यावी व पाईपलाईन टाकावी.

श्री.कृ.द.जाधव : टँकर घेण्याचा विषय मंजूर करु नये.टँकर भाडयाने लावणेत यावेत.

श्री.जोशी : मा.स्थायी समितीकडे पाईप लाईनचा प्रस्ताव अर्धवट असल्यामुळे फेटाळण्यात आलेला आहे.

श्री.भानुदास कोतकर : पाईप लाईनचा प्रस्ताव फेटाळण्यात आलेला आहे.केडगांव पाणी पुरवठयासाठी पाईपलाईन ७० लाख शासनाचे  पडलेले आहे.काम होत नाही.या खरेदीला मंजूरी दया.

श्री.गिरवले : स्थायी समितीमध्ये तातडीच्या सभेमध्ये विषय मंजुरीकरीता आलेला आहे.पण तो मंजूर होणे कठीण आहे.तो फेटाळण्यात आला.टेंडर पेक्षा जास्त दराने दर आले तर देता येणार नाही असे म्हटले आहे तर टेंडर कशासाठी मागवायचे.त्यामुळे आजच्या या सभेमध्ये बहुमताने ठराव करा.टेंडरविना कंपनीकडून निविदा मागवाव्या.

सौ.वर्षा सय्यद : पाण्याचा प्रश्न काढलेला आहे.कार्यवाहीशी नागरीकांना काही देणे घेणे नाही पाण्याच्या प्रश्न सोडवावा.निविदा आलेल्या असतांना नगरसेवक निधीची कामे मजूर फेडरेशनद्वारे करण्यास विनंती आहे.

सौ.सत्रे : शहर विकासासाठी योजना राबविणे चांगले आहे.सोनोग्राफीचे दर ५०/- ठरविल्याबद्यल अभिनंदन.आय टी उदयोगासाठी सवलती दिल्याबददल आभारी आहे.त्यासाठी जागेची व्यवस्था करावी.खाजगी शाळांनाही मोफत गणवेश देण्यात यावे.उदयोग धंदयासाठी

तरतूद करावी.महिलांच्या बचत गटासाठी मिनी मार्केट साठी १० लाखाची तरतूद करणेत यावी.तसेच स्पर्धा परिक्षेसाठी व्यवस्था करावी.तसेच सांस्कृतीक नगर महोत्सव घेण्यात यावे.

श्री.लोंढे ,सभापती : स्थायी समितीसमोर आलेला रिपोर्टात त्रुटी असल्यामुळे मंजुरी दिलेली नाही.

श्री.दिप चव्हाण : मागील वर्षातील ३ रस्त्यांपैकी आयुर्वेद्य कॉलेज ते दिल्ली गेट ते अप्पू चौक या रस्त्यांचे कामाची बिले दिली गेली काय

यावर श्री.मगर,सिटी इंजिनिअर यांनी खुलासा केला की,७५ लाख रुपयाची कामे कामाचे बिल देण्यात आलेले आहे.

श्री.दिप चव्हाण : बिल दिलेले आहे.ते पुर्ण दिलेले आहे. तीन रस्त्यांपैकी हा रस्ता राहीलेला आहे.आयुक्त साहेबांनी पहाणी करावी.तसेच मटन मार्केट ,बेग पटांगणाची इमारत ,नेहरु मार्केट इत्यादी बी ओ टी वर करावयाची कामे स्थायी समितीने ठराव केला तो स्वतःचे खर्चातून करावयाचा आहे.मा.आयुक्त यांनी लक्ष घालावे.

सक्कर चौक ते डि एस पी चौक या रस्त्यांवर स्ट्रीट लाईट बसविणेसाठी १५ लाख रुपये मंजुर केलेले होते.ते स्ट्रीट लाईटचे पोल रस्त्यांचे कामे पुर्ण झाले तरी बसले गेले नाही.तर त्या पोलचे पेंमेट दिलेले आहे काय

त्यावर श्री.सावळे यांनी खुलासा केला .

श्री.गिरवले : साईटवर पोलचे पडलेले मटेरीयल स्टोअरमध्ये जमा केलेले आहे काय

श्री.आगरकर : मी श्री.सावळे यांना कल्पना देवूनही व या कामाची माहिती देवूनही या कामाची कार्यवाही झालेली नाही.

श्री.गिरवले : साईटवर मटेरीयल पडलेले असतांना स्टोअरमध्ये जमा का झाले नाही.याबाबत चौकशी करण्यात यावी.

यावर मा.उपायुक्त साहेब यांनी खुलासा केला की,याबाबत आदेश देण्यात आलेले होते.त्याप्रमाणे कार्यवाही झालेली नाही.त्यामुळे संबंधीतावर कारवाई होणार आहे.

श्री.उडाणशिवे : पाण्याचा प्रश्न अत्यंत जिव्हाळयाचा आहे.पाण्याचे महत्व मागासवर्गीय सदस्य यांना आहे.दलीत वस्तीतील पाण्याची टाकी व पाईपलाईनचे प्रश्न प्रलंबीत आहे.दलीत वस्तीमध्येच दलीत निधीचा उपयोग करावा इतर ठिकाणी करु नये.

श्री.संजयकुमार लोंढे : केडगांव साठी १० टँकरचे पाण्याची सोय करावी.

श्री.दिप चव्हाण : शिक्षण मंडळाकडील उहापोह करतांना शिक्षण मंडळाकडे किती वर्ग आहेत शिक्षक किती आहे.

यावर प्रशासनाधिकारी ,शिक्षण मंडळ यांनी खुलासा केला की, महानगरपालिकेच्या ९ शाळा असून १३६० विदयार्थी व ४२ शिक्षक आहेत.अंदाजपत्रकामध्ये

श्री.कावरे : स्मशानभुमीसाठी तरतूद करण्यात यावी.सिना नदी पुल,सारसनगर पुल कार्यवाही करावी.रस्ते विकास महामंडळाकडून रस्ते तयार करुन घेण्यात यावे.मुंकुंदनगर केडगांव येथे पिण्याचे पाण्याची तरतूद करावी.

श्री.त्रिपाटी : अंदाजपत्रकाबाबत अभिनंदन करतो.महापौर निधीसाठी तरतूद करावी.जकाती साठी वाढलेले उत्पन्न धरावेत.मागील वर्षी सुचविलेले रस्ते तयार करावेत.

श्री.जोशी : मागील दहा रस्त्यांची कामे झालेली नाहीत.

त्यावर श्री.मगर यांनी खुलासा केला.

तरतूद केलेल्या कामापेक्षा रक्कम कमी शिल्लक असल्यामुळे कामे झालेली नाहीत.

श्री.त्रिपाटी : १० लाख निधी असतांना एकही ट्री गार्ड मिळालेला नाही.चिपाडे मळा येथील पुलाची उंची वाढवावी.नंतर तिर्थ विकास कामामध्ये आनंदधामचा उल्लेख करावा.सारसनगर पिण्याचे पाण्याची टाकी करावी.या भागात एकही उदयान नाही.टँकरबाबत जुन्या रेटने पेंमेट चालू आहे.ऑगस्ट पासून टेंडर अजून काढलेले नाही.याबाबत वाढीव खर्चाची कोणाची जबाबदारी आहे.पुर नियंत्रणासाठी तरतूद करावी.

श्री.गंधे : एकात्मिक शहर विकास योजना मिस्कीन मळा,बेलदार गल्ली ,व्यापारी संकुल सर्जेपुरा रंगभवन ,पाईपलाईन रस्ता दिवे लावणे, सावेडी गटार योजना राबविणे इत्यादी योजना राबविणे फिरता दवाखान्याऐवजी जनरल हॉस्पीटलची जरुरी आहे.केडगांव अग्निशमन दलाची

स्थापना करणे,आय टी उदयोग चांगल्या सवलती आहे.या भागात ट्री गार्ड मिळावे.पिंपळगांव माळवी तलाव योजना कधी निश्चित करणार वृक्षकर सकलीत कराची वसुली कमी आहे.रक्तपेढीसाठी २४ तास डॉक्टर असावा.घन कचरा व्यवस्थापनाबाबत सुका ओला कचरा एकत्रीत केला जात आहे.

श्री.नामदेव पवार : महानगरपालिकेने शासकीय तरतूद करावी.उपनगरातील भाजी विक्रेत्यांना गाळे वाटपामध्ये प्राधान्य देण्यात यावे.

श्री.आगरकर : सन २००७-२००८ चे अंदाजपत्रक सन्माननिय सदस्यांपुढे सादर करणेत आलेले आहे.याबाबत मा.आयुक्त ,मा.उपायुक्त ,अधिकारी ,कर्मचारी यांचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाल्यामुळे नगर शहरात एक चांगले चित्र उमटेल वस्तूनिष्ठ अंदाजपत्रक मांडलेले आहे त्याचे मी समर्थन करतो.याबाबत संवाद होणे आवश्यक आहे.या अंदाजपत्रकामध्ये पुढील २५ वर्षाचे नियोजन करुन अंदाजपत्रक केलेले आहे.इतिहासाचा परामर्श घेत असतांना भविष्यांची वाटचाल चांगली होण्याच्या दृष्टीने अशा प्रकारचे अंदाजपत्रक सादर केल्याबाबत मी अभिनंदन करतो.आयुक्त साहेब यांनी सकारात्मक दृष्टी मांडली आहे.याची दखल घेतली गेली पाहीजे.आय टी पार्क साठी पुणे येथे जावून जे पयत्न करण्यात आले ते निश्चितच अभिनंदनास पात्र आहे.विकासाचे चक्र दृष्टी सभागृहामध्ये मा.महापौर ,नगरसेवक यांनी पाठींबा दिलेला असल्यामुळे मी या अंदाजपत्रकास पाठींबा देत आहे.माझ्या काही सुचना खालीलप्रमाणे देत आहे.यु आय डी एस एम टी बाबत टाईम बाउंड प्रोग्रॅम घेण्यात यावा.बी ओ टी योजनेखाली घेण्यात आलेली प्रकरणे मार्गी लावणेत यावी.सावेडी भुयारी गटार योजनेकरीता ७५ लाखाची तरतुद करण्यात यावी.नविन नाटय गृहाकरीता सावेडी उपनगरामध्ये जागेची पहाणी करावी.रंगभवन येथे व्यापारी संकुल पर्याय शोधावा.एकात्मिक झोपडपटटी गृहनिर्माण योजना अधिकारी नेमण्यात येवून कार्यवाही करावी.व जेष्ठ नागरीकांना मोफत आरोग्य सेवा पुरविणे हा एक चांगला उपक्रम आहे.पाण्याचे टाकयास प्राधान्य देणेत यावे.पवन उर्जा बाबत काय भुमिका आहे या बाबत आयुक्तांनी खुलासा करावा.केडगांव येथील नविन फायर स्टेशन याबाबत काय भुमिका आहे.याबाबत नॉर्मस पाळले गेले पाहीजेत फोम टेंडर महानगरपालिकेकडे नाही.कर्मचारी यांची संख्या कमी आहे.त्यांचा विमा आहे काय ?

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, एक लाख लोकसंख्येकरीता एक फायर स्टेशन या नार्मस प्रमाणे केडगांव येथे एक फायर स्टेशन होवू शकते.

श्री.आगरकर यांनी एस.एन.डी.टी धर्तीवर महिलासाठी महाविदयालय काढणेसाठी विचार करावा.सिना नदी भागात प्राधान्याने वृक्षारोपण करावे.पिंपळगांव तलाव तसेच कार्यालयाचे संगणकीकरण इत्यादी ,महानगरपालिका शाळेमध्ये चांगल्या सोयी,महिलांच्या प्रगतीसाठी संगणक प्रशिक्षण देणे , स्पर्धा परिक्षांचे व्यवस्था , पाच भाजी मार्केट ओपन स्पेस पहाणे ,सावेडी भाजी मार्केटचे काम पुर्ण झालेले आहे.त्याबाबत खुलासा करावा.कर्मचारी व अधिकारी यांची असेंसमेंट करावी.कर्मचारी यांचेसाठी घरकुल योजना राबवावी.त्यांना वैद्यकीय भत्त्यांबाबतची सुविधा वाढवून दयावी.जकात विभागाकडे जे कर्मचारी नेमले होते त्यांची बदली का करणेत आली नाही.तसेच जकातीबाबत सर्व्हे करुन पारगमन चे अपेक्षीत उत्पन्न जास्तीत जास्त धरावे. या पुर्वीच्या ठेकेदाराने पिळवणूक केल्यामुळे त्यास वाचा फुटलेली आहे.जकातीचा ठेका ५० कोटी रुपयापर्यत जावयास पाहीजे.

श्री.अशोक कानडे : या अंदाजपत्रकाबाबत मी धन्यवाद देतो .आय टी पार्क साठी व्यवस्था वाढविणे, विकासात्मक दृष्टीकोन ठेवलेला आहे.अर्थ संकल्प आशावादी निर्माण झालेला आहे. मागील अनेक बाबीवर तरतूद करण्यात आली होती. वत्याबाबत अपेक्षा होत्या.यु आय डी एस एम टी साठी ५५ कोटीची तरतूदीची भर पडलेली आहे.याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे.त्याबाबतचा खुलासा करावा.याबाबत नोडल एजन्सीमार्फत फंड रिलीज होणार आहे काय याबाबतही खुलासा करावा.यापुर्वी परिपत्रक निघालेला आहे.विज बील एनर्जी सेव्हींग प्रकल्प पवन उर्जा प्रकल्पाबाबत यापुर्वी ठराव झालेला असतांनाही पुनश्च प्रस्ताव का घेण्यात आला आहे.सन २००४ मध्ये कमेटी नेमण्यात आलेली होती त्याचे काय झाले.

महिला बचत गट चळवळ,महानगरपालिकेचे कत्यर्व्य ,इंजिनिअरींग कॉलेजचा प्रस्ताव,महिला संगणक व गृहउद्योग प्रशिक्षण ,अंदाजपत्रकामध्ये जमाखर्च बाजू चांगल्या प्रकारे मांडली आहे.

ले आउट ओपन प्लॉट याच्या नोंदी करणे आवश्यक आहे.याचा अंदाजपत्रकामध्ये समावेश करणेत यावा.सावेडी भुयारी गटार योजना तरतूद करावी व टप्प्यांटप्प्यांने नियोजन करावे.सावेडी बोल्हेगांव एरीया लवकर कार्यान्वीत होवू शकेल,पुतळे बसविणेबाबत तरतूद

करण्यात यावी.पाणी प्रश्न,गटारीचा प्रश्न,स्मशानभुमी तरतूद व्हावी तसेच उपनगरामध्ये शौचालय मोहीम राबविण्यात यावी.

श्री.आसाराम कावरे : क्रिडा समिती स्थापन करावी.

श्री.लोंढे सुभाष ,सभापती : क्रिडा समितीसाठी ३५ लाखाची तरतूद करणेत यावी.

श्री.कैलास गिरवले : अंदाजपत्रकीय सभेमध्ये अनेक गोष्टींचा उहापोह करण्यात आलेला आहे.यु आय डी एस एम टी योजना रस्ते नविन करावे .एकात्मिक शहर विकास योजनेखाली बेलदार गल्लीमध्ये सांस्कृतीक हॉल व शॉपींग सेंटर करणेत यावे.अग्निशमन केंद्र स्थापन ही चांगली बाब आहे.अहमदनगर शहर लहान असल्यामुळे छोटया गाडया घेणे .महापौर दुर्धर रोग निवारण निधीमध्ये एक लाखाऐवजी ३ लाखाची करावी.व लाभार्थी साठी अडीच हजाराऐवजी पाच हजार घेण्यात यावी.महानगरपालिका झेरॉकस मशीन दुरुस्त करणेत यावी.महापौर चषक वाढ करणेत यावी.शिक्षण मंडळ वाहन भाडे तरतूद करणेत यावी.सर्व साधारण चहापान खर्च १० हजार व स्थायी समिती व इतर ३ हजार करणेत यावा.महानगरपालिकेमध्ये सर्व पक्षीय समन्वय समिती स्थापन करणेत येवून त्या बैठका नियमीतपणे घेण्यात याव्यात.

गिरवले मामा- मुद्रांक शुल्क उपलब्ध ७० लाख ठेकेदारांनी पुर्वी चुकविलेला आहे.

आयुक्त- कुठलेही अनुदान कट करु नये याबाबत कळविलेले आहे. उल्लेखनिय कामाबाबत गौरव १ लाख ५० हजार रुपयांची तरतुद करण्यात यावी. पंकज शिरसाठ यांना देण्यासाठी अनुदान मा.श्री.सुळ, उपमहापौर आणी गिरवले मामा महापौर व उपमहापौर यांच्या गाडया घेउन्न ३ वर्षे झालेली आहेत. गाडया घेण्यात याव्यात. तरतुद वाढविण्यात यावी. १० लाख रुपये तरतुद करण्यात यावी. महापौर चषक ठरावामध्ये दुरुस्ती करण्यात यावी.

विकास कामासाठी विकास समिती असावी. महापौर यांना बरोबर घेण्यात यावेत.

मा.श्री.कावरे- महानगरपालिकेचे कर्मचारी यांचेसाठी ५० लाख रुपयांची तरतुद करावी अशी विनंती.

मा.श्री.मुदस्सर- ५ कामे मंजुर झाली होती ती अद्याप झालेली नाहीत. दवाखान्याच्या कामासाठी आलेला निधी रोडचे काम न झाल्यामुळे परत जाण्याची शक्यता आहे. नागापुरचा सुध्दा दवाखाना सुरु झाला पाहिजे. मुकूंदनगर ,केडगांव झोन क्रमांक ३ मधुन झोन क्रमांक ४ मध्ये टाकण्यात यावे. बोट टाईप गेस्ट हाउत्रसच्या जागेत सांस्कृतिक भवन , भाजी मार्केट , शॉपिंग सेंटर इ. उघडण्याची तरतुद करण्यात यावी. नगरसेवक निधी १० लाखापर्यंत तरतुद करण्यात यावी.

मा.श्री.शेळके- भुसंपादनासाठी तरतुद केलेली आहे. परंतु भुसंपादन कोणकोणत्या ठिकाणी करावयाचे आहे.

श्री. धोंगडे- भुसंपादनबाबत वसंत टॉकीजची जागा भुसंपादन मधुन २ लाख कमी करुन नगरसेवक निधीमधे टाकावा.

मा.श्री.शेळके- प्रत्येक सभासदाला ९ लाख निधी देण्यात यावा.

मा.श्री.भगवान फुलसौंदर- जकातीचे ठेके मागील वर्षी देण्यात आला आहे. नगरसेवक जनतेचे नगरसेवक आहे. ४ झोन नेमलेले आहे. संबंधित कर्म चा-यांनाच जनरल बोर्डमध्ये बोलवावे. कामे मंजुर आहे परंतु इम्प्लिमेंटेशन होत नाही. फ-याबाग डिपार्टमेंट करणे.

नगरदर्शन-शहरदर्शन अशी बस सुरु करावी. चाँदबीबी महाल, फ-याबाग पिंपळगाव अशी बस सुरु करावी.

४ रस्त्याचे काम अद्याप राज्य रस्ते विकास मंडळाकडुन करुन घेण्यात यावे.

नगरसेवक निधीचे काम १५ दिवसात पुर्ण होणेसाठी विचार करावा.

स्टाफिंग पॅटर्न स्थायी समितीपुढे आणावे.

आमरधाम मध्ये लाईट असावी. जनरेटर असावे.

महापौर- सौर उर्जाने सिध्दीबाग, मच्छीबाग , महालक्ष्मी उद्यान या ठिकाणी दिवे बसविणार आहे. आय.टी. साठी जबाबदार अधिकारी यांची नेमणुक करावी. शहरामध्ये विमानतळ असावा. बी.ओ.टी. तत्वावर. जकातीचा ठेका २००४-२००५ ची कामे करुन घ्यावे.

महापौर- शिवशाहीर महाराष्ट्र शाहीर जिल्हा अध्यक्ष पदावर नेमुणुक झाल्याबद्दल श्री.उडानशिवे यांचा सत्कार करण्यात आला.

मा.श्री.उडानशिवे- लालटाकी, रामवाडी, कौलारु  झोपडपट्टी जागा विकत घ्यावी व घरे बांधावे. कमी उत्पन्नाच्या गटाच्या लोकांना घरकुल बांधण्यात यावे.

मा.श्री.डागवाले साहेब- सभापती यांनी चांगले अंदाजपत्रक मांडले. त्यांना धन्यवाद देउञ्न अभिनंदन केले व सभासदांच्या सुचनांचा विचार करुन विकास केला आहे. मा.श्री.भानुदासजी कोतकर साहेब ,आगरकर साहेब, विरोधी पक्षाला सामावुन घेउञ. वेगवेगळया सुचनांची नोंद करुन अंदाजपत्रकास मान्यता द्यावी.

मा.श्री.आगरकर साहेब- काटवन खंडोबा ते सिना नदीपुल रस्ता करणे रस्ते भुसंपादन. नगरसेवक निधी ७ लाख ऐवजी ९ लाख, महापौर निधी २ कोट.

दिप चव्हाण- जकात कराबाबत कार्यवाही करतांना, पारगमन फी आकारतांना म.न.पा. चे पावती पुस्तक न वापरता जकात अभिकर्ता यांनी अधिकाराचा गैरवापर करुन स्वतः पावती पुस्तके छापुन वापरली आहेत. याबाबत माहिती मिळावी अशी मागणी केली.

श्री.डवरे- गेल्या ३ महिन्यापासुन महानगरपालिकेचे छापलेले पारगमन फी चे पावती पुस्तक जकात अभिकर्ता यांनी न वापरता स्वतःच्या संगणकावर तयार केलेल्या पध्दतीनुसार जकात अभिकर्ताच पावत्या देत आहे. यापुर्वी वेळोवेळी पावती पुस्तक मागवुन घेतले जात होते.

मा.श्री.दिप चव्हाण- पारगमन फी स्वतःच्या पावती यंत्रणेमधुन दिली आहे. तर मग ३ महिन्याचा पारगमन फी चा भरणा याबाबत माहिती द्यावी.

मा.श्री.गिरवले- जकात अभिकर्ता यांनी असे कृत्य केलेले असल्याने व त्याबाबत जकात अधिक्षक अहमदनगर महानगरपालिका यांनी देखील माहिती दिलेली असल्याने जकात अभिकर्त्यास काळया यादीत टाकण्यात यावे. या करीता साई एन्टरप्रायजेसचे संचालक जयराज कल्याणी, रा.उल्हासनगर, श्री,जयप्रकाश कल्याणी रा.उल्हासनगर, श्री.दिनकर पाटील रा. सांगली यांचेवर तसेच कामकाजाचे अधिकारपत्र बहाल केलेले श्री.जयकुमार गोरे यांनी सर्वांनी मिळुन संगनमताने महानगरपालिकेच्या विषयांकीत कराराचा भंग केल्याचे दिसुन येते.

मा.श्री.नामदेव पवार- साई एन्टरप्रायजेस तसेच या जकात अभिकर्त्याच्या इतर फर्मव्दारे जकात ठेका घेण्याचे काम करीत असेल अशा निगडीत असलेल्या कोणत्याही फर्मला पुढील ३ वर्षाकरीता जकात ठेका देण्यात येऊ नये व संबंधित फर्मचे मालक व संबंधित व्यक्ती यांना काळया यादीत टाकण्यात यावे.

मा.श्री.अनंत जोशी- जकात अभिकर्त्याने महानगरपालिकेशी केलेल्या करारातील अटी शर्तींचा भंग केलेला असल्याने त्यांचेवर योग्य ती कारवाई करण्यात यावी व काळया यादीत टाकण्यात यावे.

मा.श्री.गिरवले- सन २००७-२००८ या आर्थिक वर्षाकरीता जकातीचा ठेका देतांना यापुर्वीच्या ठरविलेल्या अटी शर्तीसह पुढील अटी शर्तींचा समावेश करण्यात यावा.

१. मागील ३ वर्षात टेंडरच्या देकार रकमेचे व्यवहार असणे आवश्यक आहे. (टर्नओव्हर)

२. ठेकेदाराची (निवीदाधारक) भांडवल स्थिती (नेटवर्क) कमीत कमी ५ टक्के (देकार रकमेच्या) असणे आवश्यक आहे.

मा.श्री. नामदेव पवार-

३) (जॉईंट व्हेंचर) असलेल्या कुठल्याही संस्थेची निविदा स्विकारण्यात येऊ नये.

४) निविदा धारकाने महाराष्ट्रामध्ये जकात कर वसुलीचे काम केल्याबाबत किमान १ वर्षाचा अनुभव याबाबतची कागदपत्रे सादर करणे बंधनकारक ठेवावे.

मा.श्री.गिरवले-

५) किमान ३० कोटी रुपये व्यवहाराच्या कामाकरीता सदर फर्मने भाग घेतलेला असावा.

६) २ ते ३ वर्षे या कालावधीतील लेखापरिक्षण विवरणपत्रे तसेच ताळेबंद याची माहिती निविदाकाराने निविदा भरतांना सोबत जोडणे आवश्यक आहे.

## ठराव :

ऑफिस रिपोर्ट व मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारसी व सभेमध्ये झालेल्या साधक बाधक चर्चेनुसार अंदाजपत्रक उत्पन्नाचे स्त्रोत व भविष्या मध्ये शहर वासियांकरिता कामाचे नियोजन करून ते पूर्णत्वास न्यावयाचे दृष्टिने ही सभा सन २००६-०७ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २००७-०८ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा स्कूल बोर्ड सह) याबाबत पुढील प्रमाणे निर्णयासह मंजूरी देत आहे.

१) महापौर दुर्धर रोग सहाय्यता निधीमध्ये प्रतिरूग्ण नागरिकास रू. २,५००/- अर्थ सहाय्य देण्यात येत होते. ते रूपये ५,०००/- देण्यात यावे. रू. २,००,०००/- तरतुद करण्यात यावी. आपत्तकालीन सहाय्यता निधीमधून रूपये १ लाख सदर कामाकरिता वापरण्यात यावा.

२) महापौर शहर विकास कार्यनिधी स्थापन करण्यात यावा. त्यामध्ये रूपये २ कोटीची तरतुद करण्यात यावी. त्याकरिता विकासभार या लेखाशिर्षा मधून १ कोटी ५० लाख रूपये वर्ग करण्यात यावे. तसेच रूपये ५० लाख भूसंपादन या लेखाशिर्षा मधून वर्ग करण्यात यावे. तसेच सभागृहातील सदस्यांच्या आग्रही मागण्याचा विचार करता प्रभाग स्वेच्छा निधी रूपये सात लाख ऐवजी रूपये आठ लाख खर्चास मंजूरी देण्यात येत असून वाढील रक्कम रूपये सत्तर लाख तरतुद करण्याकरिता नविन रस्ते लेखाशिर्षा मधून रूपये चाळीस लाख तर भूसंपादन लेखाशिर्षामधून रूपये तीस लाख वर्ग करण्यात यावे.

३) महिला उदयोजकांना व्यावसायिक क्षेत्रामध्ये प्राधान्य मिळावे याकरिता व्यापारी संकुल उभारण्यात यावे याकरिता नविन इमारत लेखाशिर्षामधून १० लाख रूपयाची तरतुद ठेवण्यात यावी.

४) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळा मार्फत रस्ते विकास प्रकल्प राबविण्यास ही सभा मान्यता देत असून त्याकरिता आवश्यक ती तरतुद ठेवण्यात यावी.

५) दोहा येथे अशियाई क्रीडा स्पर्धेत सुवर्ण पदक विजेते अहमदनगरचे सुपुत्र श्री. पंकज क्षिरसाठ यांना जागतिक पातळीवर खेळण्याकरिता रूपये १ लाख ५० हजार देण्यात यावे. उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव ही आर्थिक तरतुद रूपये ३ लाख करणेत यावी याकरिता रूपये २ लाख जमिन भूसंपादन करणे या लेखाशिर्षा मधून वर्ग करण्यात यावे.

६) अहमदनगर शहर व परिसरातील ऐतिहासिक ,धार्मिक व सांस्कृतिक वारसा लाभलेल्या वास्तुंचे पर्यटकांना दर्शन व्हावे याकरिता शहरामध्ये अहमदनगर दर्शन अशी बससेवा सुरू करावी.

७) एल ॲण्ड एम ब्लॉक पोटी मिळणारे उत्पन्न रक्कम रू. ५९ लाख ५९ हजार वगळून सुधारित जकातीचे अपेक्षित उत्पन्न धरणेत येवून सन २००७-०८ या आर्थिक वर्षा करिता निविदा मागविणेत याव्यात. यापूर्वी निविदा मागणी केलेली प्रक्रिया रद्द करावी.

८) सभापती मनपा शिक्षण मंडळ यांचे कार्यालयीन कामासाठी वाहन उपलब्ध करून देण्यात यावे. व त्याचा खर्च रक्कम रू. १ लाख ५० हजार जमिन भूसंपादन या लेखाशिर्षातून करणेत यावी.सदरबाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी.

९) प्रशासकीय इमारत बोट टाईप गेस्ट हाउत्रस येथील जागेत उभारणे बाबत ही सभा मान्यता देत आहे.

१०) महाराणा प्रताप व छत्रपती संभाजी महाराज या राष्ट्रपुरूषांचे पुतळे उभारणेस ही सभा मान्यता देत असून त्याकरिता रूपये २० लाखाची तरतुद करण्यात यावी. भूसंपादन लेखाशिर्षा मधून सदरचा खर्च भागविण्यात यावा.

११) मनपाचे पदाधिकारी व अधिकारी यांना प्रशासकीय कामाकरिता वेळोवेळी मुंबई येथे जावे लागते यास्तव मा.आयुक्त, मा.महापौर, मा.उपमहापौर यांचेकरिता नविन व सुसज्ज वाहन खरेदी करण्यात यावे.

१२) सन २००६-०७ या आर्थिक वर्षा मध्ये मोठया प्रमाणात पाणी पुरवठा पाईपलाईनच्या कामाच्या निविदा काढण्यात आल्या परंतु निविदाधारकांनी ३० ते ५० % गैरवाजवी निविदा भरण्यात आल्या व पुनःश्च या बाबींची पुर्नरावृत्ती होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरिता ही सभा महाराष्ट्र जीवन प्राधीकरण यांचेकडील दरकरारानुसार मनपाच्या कामासाठी पाईपची खरेदी करण्याबाबत मा.आयुक्त अहमदनगर मनपा यांना प्राधीकृत करीत आहे. मा.आयुक्त, अहमदनगर मनपा यांनी उन्हाळयाचे दिवस व पाण्याच्या अभावामुळे नागरिकांची होणारी गैरसोयीचा प्रश्न सोडविण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी या व पुढील आर्थिक वर्षा सह दाखल होणा-या प्रस्तावाबाबत सदरची कार्यवाही करण्याचे अधिकार ही सभा देत आहे.

१३) जलजन्य आजार या करिता आणखी दोन लक्ष रूपये तरतुद वाढवून विकास योजना विशेष घटक कर्मचारी आस्थापना या लेखाशिर्षातून सदरची रक्कम वर्ग करण्यात यावी.

१४)नविन शव वाहिनी खरेदी करण्यात यावी. यास्तव अतिक्रमण विभाग वाहन खरेदी तरतुद वापरण्यात यावी.

१५) मा.सर्व साधारण सभा व मा.स्थायी समिती चहापान खर्च तरतुद वाढवावी अनुक्रमे रूपये १०,००० /- , ३,००० /- करावी.

याकरिता पुढील प्रमाणे ही सभा निर्णय घेत आहे.

**अहमदनगर महानगरपालिका ,अहमदनगर**

**मा. खास सभेने मंजुर केलेले सन २००७-२००८ चे मुळ अंदाजपत्रक**

| | | |
|---|---|---|
| | **सुरवातीची शिल्लक (०१/०४/२००७)** | **५०००००** |
| | **एकुण जमा** | **१५२२६८११००** |
| | **सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा** | **१५२३१८११००** |
| | **एकुण खर्च** | **१५२२६८०५००** |
| | **अखेरची शिल्लक (३१/०३/२००८)** | **५००६००** |

| **अ. क्र.** | **लेखाशिर्ष (खर्च बाजू)** | **मा. स्थायी समितीने केलेली तरतूद** | **मा. खास सभेने केलेले बदल** | | **मा. खास सभेने केलेली तरतूद** |
|---|---|---|---|---|---|
| | | | **वाढ** | **घट** | |
| **१** | **२** | **३** | **४** | **५** | **६** |
| १ | महापौर दुर्धर रोग निवारण निधी | १००००० | १००००० | | २००००० |
| २ | महापौर आपतकालीन सहायता निधी | २००००० | | १००००० | १००००० |
| ३ | महापौर शहर विकास निधी | ० | २००००००० | | २००००००० |
| ४ | विकास भार निधी | १७५००००० | | १५०००००० | २५००००० |
| ५ | भू-संपादन | १५१००००० | | १२५५०००० | २५५०००० |
| ६ | उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव | १५०००० | २००००० | | ३५०००० |
| ७ | वाहन खर्च (शिक्षण मंडळ) | ० | १५०००० | | १५०००० |
| ८ | नविन फायर फायटर खरेदी | २५००००० | ५००००० | | ३०००००० |
| ९ | सांस्कृतिक कार्यक्रम | ७००००० | १००००० | | ८००००० |
| १० | पुतळे बसविणे | ० | २०००००० | | २०००००० |
| ११ | मा. सदस्य प्रभाग विकास स्वेच्छानिधी | ४९०००००० | ७०००००० | | ५६०००००० |
| १२ | नविन रस्ते | २००००००० | | ४०००००० | १६०००००० |
| १३ | महापौर चषक | १०००००० | १५००००० | | २५००००० |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| १४ | जलजन्य आजार नियंत्रण | २००००० | २००००० | | ४००००० |
| १५ | विकास योजना वि. घटक आस्थाप-ना | ४७५००० | | २००००० | २७५००० |
| १६ | मा. महासभा, स्थायी समिती, इतर प्रभाग समिती, अतिथी चहापान | १००००० | १००००० | | २००००० |
| १७ | नविन वाहन खरेदी (अतिक्रमण) | ७००००० | | ६५०००० | ५०००० |
| १८ | नविन शववाहिनी | ० | ६५०००० | | ६५०००० |
| | | | | | |
| | | **१०७७२५०००** | **३२५०००००** | **३२५०००००** | **१०७७२५०००** |

जकात कर वसुली व उपाय योजना बाबत -

जकात कर वसुल करणारे जकात अभिकर्ता मे. साई एंन्टरप्राईजेस या फर्म बाबत अंदाजपत्रकीय सभेमध्ये बरीच चर्चा व उहापोह झाला आहे. व्यापा-यांना सदर फर्म कडून झालेल्या त्रासाबाबत अनेक तक्रारी अधिकारी व पदाधिकारी यांचेकडे दाखल झालेल्या आहेत. याचा देखिल ही सभा गांभार्याने विचार करून पुढील प्रमाणे कारवाई करणे बाबत ठरवित आहे -

१) पारगमन फी आकारताना महानगरपालिकेचे पावती पुस्तक वापरणे बंधनकारक असताना सदर फर्म ने गेल्या तीन महिन्या पासून स्वतःहाचे संगणकावर विकसीत केलेली पावती वापरली आहे. याबाबत जकात अधिक्षक अहमदनगर महानगरपालिका यांनी देखील माहिती दिली यास्तव महानगरपालिकेच्या करारनाम्याचा भंग केल्याचे दिसून येत आहे. यास्तव ही सभा साई एंन्टरप्राईजेस या संस्थेस काळया यादीत टाकण्याबाबत मान्यता देत आहे. तसेच साई एंन्टरप्राईजेसचे संचालक श्री.जयराज कल्याणी रा. उल्हासनगर, श्री.जयप्रकाश कल्याणी रा.उल्हासनगर ,श्री.दिनकर पाटील रा. सांगली तसेच सदर फर्मचे कामकाज पाहणारे सदर संस्थेने नियुक्त केलेले श्री.जयकुमार गोरे यांनी सर्वांनी मिळून महानगरपालिकेची फसवणुक केल्याचे निदर्शनास आल्याने संबंधीतांनवर योग्य ती कायदेशीर कारवाई करणेस देखील ही सभा मान्यता देत असून सदर फर्म व तीचे संचालक यांचे संबंधीत जकात कर वसुल करणा-या कुठल्याही संस्थे मार्फत महानगरपालिकेने भविष्यामध्ये जकात कर वसुलीचे काम देवू नये असेही ठरविण्यात येत आहे. याबाबतचा कालावधी कमीत कमी तीन वर्ष असावा.

२) सन २००७-०८ या आर्थिक वर्षा करिता जकात कर वसुली बाबत निविदा मागविताना पूर्वीच्या अटी शर्ती कायम ठेवून त्यामध्ये आणखी पुढील अटी शर्ती हे सभागृह ठरवित आहे. त्याचा देखील वापर करून निविदेबाबत कार्यवाही करण्यात यावी.

अ) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकास पुर्वीचा किमान १ वर्षाचा अनुभव व एका वर्षात किमान ३० कोटी रकमेचा जकात वसुलीचा अनुभव असावा.

ब ) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकांने पुर्ण झालेल्या लगतच्या मागील ३ वर्षात म्हणजेच सन २००३-२००४ , २००४-२००५, २००५-२००६ मध्ये किमान देकार रकमेइतक्या आर्थिक रकमेची उलाढाल केलेली असावी. व त्यासाठी ३ वर्षाचे लेखापरिक्षण करण्यात आलेले लेखाविवरणपत्र सादर करणे आवश्यक आहे.

क ) जकात अभिकर्ता नेमणुकीसाठी निविदा धारकाची भांडवली स्थिती किमान देकार रकमेच्या किमान ५ टक्के एवढी असावी. व त्यासाठी सन २००५-२००६ या आर्थिक वर्षाचे लेखापरिक्षण करण्यात आलेले लेखाविवरण पत्र सादर करणे आवश्यक आहे.

ड ) संयुक्तपणे (जॉईंट व्हेंचर) अन्वये सादर केलेली निविदा ग्राहय धरण्यात येउ नये.

ई ) निविदे सोबत बयाणा रक्कम ही नियमाप्रमाणे भरून घेण्यात यावी. तसेच अनामत रक्कम भरून घेताना बॅक गॅरंटी किंवा धनादेश किंवा रोख स्वरूपात स्विकारणे बाबत कार्यवाही करताना मुळ कागदपत्रे सादर करणे बंधनकारक ठेवावे. तसेच सदर कार्यवाही किमान एक दिवस अगोदर होणे आवश्यक राहील.

यापमाणे जकात कर वसुलीची निविदा मागविताना अटी शर्ती चा समावेश करूनच पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

मा.महापौर साहेब यांचे मनोगताबाबत :-

ऑफिस रिपोर्ट पाहता व मा.स्थायी समितीने सुचित केलेल्या रस्त्यांसह मा.महापौर यांचे मनोगता बाबत ही सभा त्यांचे मन:पूर्वक आभार मानत असून त्यांनी सुचित केलेल्या पुढील रस्त्यांचा देखील ही सभा समावेश करीत आहे.

१) प्रभाग क्र. ७ मधील शाहू नगर कॉर्नर ते ओंकार नगर ते मारूती मंदिरा पर्यत रस्ता करणे.
२) प्रभाग क्र. ४ मधील पराग उदयान कोपरा ते चांदणी चौक कोपरा पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.
३) प्रभाग क्र. ३ मध्ये पावन गणपती मंदिर ते समिर नगर ते दर्गा दायरा पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.
४) प्रभाग क्र. १२ मध्ये प्रोफेसर कॉलनी चौक ते गुलमोहर रोड चौका रस्ता डांबरीकरण करणे.
५) प्रभाग क्र. १९ मध्ये नेप्ती नाका चौक ते दिल्लीगेट ते पत्रकार चौक रस्त्याचे डांबरीकरण करणे.
६) प्रभाग क्र. २ करिता मा.महापौर यांनी सुचीत केलेल्या रस्त्याबाबत मा.सदस्य विनीत नाथ पाउलबुधे यांचे मागणी नुसार बदल करण्यात येवून तो पुढील प्रमाणे करणेस ही सभा मंजूरी देत आहे. गुलमोहर पोलिस चौकी (सावली बस स्टॉप )शिलाविहार , श्रीराम चौक ते नित्यसेवा हौसिंग सोसायटी, नामदेव चौक ते औरंगाबाद रस्ता या रस्त्याचे रूंदीकरणासहीत डांबरीकरण करणे (साईड ड्रेनसहीत )
७) प्रभाग क्र.२ मध्ये पाईप लाईन रस्ता ते तपोवन रस्ता डांबरीकरण करणे.

८) प्रभाग क्र. १२ मध्ये सावेडी नाका ते रावसाहेब पटवर्धन पतसंस्था (जुनी) ते अहिल्यानगरी चौक रस्ता डांबरीकरण करणे.

९) भंडारी किराणा ते राणी लक्ष्मीबाई चौक ते चर्च लक्ष्मीबाई चौक ते अजिक्य नगर लक्ष्मीबाई चौक ते गारूडकर सर घर रस्ता डांबरीकरण करणे.

१०)पोखरणा ज्वेलर्स नवीपेठ ते लाडली ड्रेसेस ते राजे शहाजी चौक कॉर्नर रस्ते डांबरीकरण करणे.

११) दिल्ली गेट येथील नाना महाराज मठ ते नवरंग व्यायाम शाळा ते सर्जेपुरा ते कोंडयामामा चौकापर्यत रस्ता डांबरीकरण करणे.

तसेच प्रभाग क्र. ८ मध्ये नगर पुणे हायवे कोपरा ते केडगांव देवी ते ताराबाग ते एकता कॉलनी ते अमित नगर नविन ड्रेनेज लाईन टाकणे.

याकामास प्रशासनाने कामकाजाचे नियोजना मधून प्राधान्य दयावे व नविन आर्थिक वर्षात पूर्ण करण्याबाबत दक्षता घ्यावी.तसेच सभागृहामध्ये झालेल्या चर्चेनुसार ठरविण्यात येते की,अहमदनगर महानगरपालिकेमध्ये क्रिडा व सांस्कृतीक या क्षेत्रामध्ये सुसुत्रता व नियोजनबध्द व शहर वासीयांसाठी उपयोगी असे कार्यक्रम राबविता यावेत याकरीता क्रिडा व सांस्कृतीक समिती गठीत करणेत यावी.यास्तव इतर महानगरपालिकेमधून समितीच्या रचनेबाबत व कामकाजाबाबत नियमावली बाबत माहिती मागविण्यात यावी.

सदर अंदाजपत्रकाच्या २०० प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणारे खर्चास ही सभा मंजुरी देत आहे.खर्च मंजुर नियमानुसार कार्यवाही करावी.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सुचक : मा.श्री.डागवाले किशोर आसाराम

अनुमोदक : मा.श्री.मैड सतिष बबनराव

सही/-.

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.